# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्रमांक संगाबाअवि-३/संपमुमं/१७४/२०२०
दिनांक : ८/०६/२०२०

प्रति,
संतगाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी
संलग्नित महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी.

**विषय : विद्यार्थ्यांना परीक्षासंबंधीत उद्‌भवलेल्या समस्या व्हाट्सअपद्वारे सादर करण्याबाबत....**

विद्यार्थी मित्रांनो, राज्यात कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादूर्भाव असल्यामुळे आणि तो रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनाने वेळोवेळी निर्देश जारी केलेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाचे परिक्षेत्र हे पाच जिल्ह्यांमध्ये व्यापलेले असल्यामुळे या पाचही जिल्ह्यांमधून मोठ्या प्रमाणात विद्यापीठात विद्यापीठीय परिक्षेसंदर्भात असलेल्या अडचणींचे निवारण करण्याकरीता विद्यापीठामध्ये विद्यार्थी दाखल होतात. यामध्ये विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा व श्रम तर खर्च होतातच, त्याशिवाय सद्यस्थितीत कोरोना विषाणू (कोविड-१९) चा प्रादूर्भाव असल्यामुळे प्रवासादरम्यान कोरोना या संसर्गजन्य रोगाची लागण होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. यावर उपाययोजनेचा एक भाग म्हणून आपल्या परीक्षासंबंधी समस्या खाली दिलेल्या नमुना-अ मधील अर्जामध्ये कोऱ्या कागदावर स्वलिखीत हस्ताक्षरात **9356800673** या मोबाईल Whatsapp क्रमांकावर पाठविल्यास आपल्या समस्यांचे सात दिवसाचे आत निराकरण करण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येईल.

पदवीप्रमाणपत्रे, दुय्यम पदवीप्रमाणपत्रे, पदवीप्रमाणपत्रे पडताळणी, गुणपत्रिका पडताळणी बाबतच्या अर्जावर प्रचलित पद्धतीने शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त Whatsapp क्रमांकावर, **नमुना-अ** प्रमाणे आलेले अर्जच विचारात घेतले जातील, या व्यतिरिक्त ई-मेल, पोष्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष विद्यापीठामध्ये येवून दिलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घेवून सहकार्य करावे.

आपला,

(डॉ.हेमंत रा. देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**"अर्जाचा नमुना-अ"**

**(सदर नमुना अर्ज-अ कोऱ्याकागदावर स्वलिखीत हस्ताक्षरात सुस्पष्ट फोटोकाढून मोबाईल क्रमांक 9356800673 वर Whatsapp करावा.)**

प्रति,
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

१) विद्यार्थ्यांचे पूर्णनांव (प्रवेशपत्रानुसार किंवा गुणपत्रिकेनुसार) : ..............................................................
२) महाविद्यालयाचे नांव : ..............................................................................................
३) वर्गवारी (नियमित/माजी/बहिशाःल) : ..............................................................................
४) परीक्षेचेनांव : ..............................................................................................
५) परीक्षेचे वर्ष (उन्हाळी/हिवाळी) : ..............................................................................
६) संबंधीत परीक्षेचा परीक्षाक्रमांक : ..............................................................................
७) परीक्षा केंद्राचेनांव : ..............................................................................................
८) समस्यांचे तथा त्रूटीचे स्वरुप - मोजक्या शब्दामध्ये पूर्णपणे स्पष्टता असावी.
..............................................................................................................................
..............................................................................................................................
९) भ्रमणध्वनीक्रमांक (Mobile No.) : ............................................. याच क्रमांकावर आपणांस विद्यापीठाद्वारे संपर्क साधण्यात येईल.
१०) याअगोदर याच कारणासाठी अर्ज केला असल्यास त्या अर्जाची तारीख : ..............................................
११) पत्रव्यवहाराकरीता संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) : ----------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------

दिनांक : ....../....../२०२०                    (विद्यार्थ्याचे पूर्णनांव व स्वाक्षरी)

**(टिपः** विद्यार्थ्याने समस्या/त्रूटी अर्जामध्ये दिशाभूल अथवा खोटी माहिती पुरविल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ४८(५)(ए) अन्वये शिक्षेस पात्र राहील.)